प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ योजनेतंर्गत घरकुल लाभार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राज्य हिस्स्याचे अतिरिक्त रु.५०,०००/- इतके वाढीव अनुदान देण्याकरीता निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : प्रआयो-२०२५/प्र.क्र.१८१ (E-१४१९४७७)/योजना-५**
मोती महल, २ रा मजला, १९५,
जे.टाटा रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२०.
दिनांक : २७ मार्च, २०२६.

**संदर्भ** १ -:. ग्रामविकास व पंचायत राज विभाग शासन निर्णय क्रमांक :प्रआयो-२०२५ /प्र.क्र.०४/ योजना-१० ,दिनांक०४ .०४.२०२५.
२. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२५/ प्र.क्र.१ /३८ योजना-५, दिनांक१२ .११.२०२५.
३. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२५/ प्र.क्र.१८१(१४१९४७७)/योजना-५, दिनांक१ २.०२.२०२६.
४. अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय यांचे क्र.प्रआयो-२०२६/प्र.क्र.२४/यो-१०, दि.१२.०३.२०२६ रोजीचे पत्र.

**शासन निर्णय :-**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राज्य हिस्स्याचे प्रति लाभार्थी रु.५०,०००/- इतके अतिरिक्त अनुदान (लेखाशिर्ष २२२५ जी६५३ ) उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये ४०,००,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस कोटी फक्त) इतका निधी राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांना वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी वितरीत करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” आणि उप संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**३.** वित्तीय नियमावली व महाराष्ट्र अर्थ नियमावली पुस्तिकानुसार वित्त विभागाने निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सदर निधी खर्च करताना कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याची, तसेच सदर निधी खर्च केल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) वेळोवेळी महालेखापाल, शासन व संबंधितांना सादर करण्याची जबाबदारी ही संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांची राहील.

**४.** याबाबतचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मागणी झेडजी-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०३ मागासवर्गीयांचे कल्याण, १०२-आर्थिक विकास, (०१) विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण, (०१) (१७)-प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ (अतिरिक्त राज्य हिस्सा) (२२२५ जी ६५३) ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०३२७१५५७४४२९३४ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH VAMAN SARANG

Digitally signed by MAHESH VAMAN SARANG
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Other Backward Classes Welfare, 2.5.4.20=CDB9AB5EB0E07223D8D52657095F21ED926AAA5059EAC40EE93D0E34A1FBD1F4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F69F7D02E8869F5B3A4C2B8A9895589FF307B9C66DE751750FC9831B49A017C0, cn=MAHESH VAMAN SARANG
Date: 2026.03.27 15:58:28 +05'30'

**(म. वा. सारंग)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
४. लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा व निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. उप सचिव (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. अवर सचिव (यो-१०), ग्राम विकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. मा.मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

९. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१०.सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

११. निवडनस्ती (योजना-५).